जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेसनोट क्रमांक :- २४७ दिनांक :- ०८/०९/२०२१

# काशिमिरा वाहतूक विभागामार्फत बेवारस वाहनांची विल्हेवाट लावण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार.

काशिमीरा वाहतूक विभागाचे कामकाज सुरु झाल्यानंतर काशिमीरा वाहतूक कार्यक्षेत्रातील रस्त्यावर बेवारस स्थितीत पडलेली वाहने, अनेक दिवस रस्त्याच्या कडेला लावून ठेवलेली वाहने, पादचा-यांना चालण्यास व वाहतूकीस अडथळा करित असलेली वाहने तसेच महानगरपालिका सफाई विभागास साफसफाई करतांना त्या वाहनांचा अडथळा होवू लागला तसेच वाहनांखाली अवती-भवती कचरा साठून अस्वच्छता व रोगराई परसण्याची शक्यता निर्माण झाल्याने सदरची बेवारस वाहने काशिमीरा वाहतूक विभागाकडून ताब्यात घेवून महानगरपालिकेने उपलब्ध करुन दिलेल्या मिरा गांवठाण येथील रिकाम्या बंदिस्त जागेत ठेवण्यात आली आहेत. सदरची प्रक्रिया ही सुमारे गेल्या १० वर्षापासून सतत चालू असून आतापर्यंत मोठया संख्येने विविध प्रकारची वाहने तेथे ठेवण्यात आलेली आहेत आणि यामुळे सदरची जागा अपूरी पडून तेथील परिसर व्यापला आहे.

सदर ताब्यात असलेल्या वाहनांपैकी ६७ ऑटो रिक्षा व ३८ मोटार सायकल अशी एकुण १०५ मोटार वाहने ही पुर्ण गंजुन गेली असून त्यांचे इंजिन क्रमांक, चेसिस क्रमांक तसेच त्यांचा रजिष्ट्रेशन क्रमांक मिळून येत नाही. सदर १०५ वाहने पुर्णपणे गंजलेल्या सांगाडयाच्या स्थितीत आहेत. याबाबत नागरिकांना अवगत होण्यासाठी स्थानिक वृत्तपत्रांत, प्रसिध्दी माध्यमांमध्ये प्रसिध्दी देण्यात येत असून वाहनांबाबत हक्कदार यांनी त्यांचे मुळ कागदपत्रांसह पोलीस निरीक्षक, काशिमिरा वाहतुक विभाग, परि-१, मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय येथे संपर्क साधावा.

या आवाहानाचे अनुषंगाने १५ दिवसांत नमुद विना दावा असलेल्या १०५ वाहनांबाबत दावा अगर मालकीहक्क सिध्द न झाल्यास त्यांची योग्य त्या पध्दतीने कायदेशीर विल्हेवाट लावण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.

----ooo----